**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २३ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

- **नव्या उपराष्ट्रपतींच्या निवडीसाठी निवडणूक आयोगाकडून प्रक्रीया सुरु.**
- **वैश्विक एकात्मता टिकवण्याचे काम संत नामदेव महाराज यांनी केले- 675 व्या संजीवन समाधी सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन.**
- **केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना यंदाचा लोकमान्य टिळक पुरस्कार जाहीर.**
- **पुढील 2 दिवस विदर्भात पावसाचा यलो अलर्ट, बुलडाणा यवतमाळ मध्ये मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत.**

**आता सविस्तर बातम्या .......**

उपराष्ट्रपती निवडणूक

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर नव्या उपराष्ट्रपतींच्या निवडीसाठी भारत निवडणूक आयोगानं निवडणुक प्रक्रियेला सुरुवात केली आहे. याअंतर्गत घोषणेपूर्वीच्या तयारीचा भाग म्हणून राज्यसभा आणि लोकसभेतील नामनिर्देशित सदस्यांचा समावेश असलेल्या मतदार संघांची तयारी, निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निवडीला अंतिम स्वरुप देणं तसंच यापूर्वीच्या सर्व उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकांशी संबंधित दस्तऐवज तयार करून ते प्रसारित करण्याची कामं सुरु केली असल्याचं आयोगानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. या तयारीच्या टप्प्यांनंतर, लवकरच उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची अधिकृत तारीख घोषित केली जाईल, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

पावसाळी अधिवेशन/संसद

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आज सलग तिसऱ्या दिवशी, विरोधी पक्षांनी विविध मुद्यांवरून गदारोळ केल्यानं दोनही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. आज लोकसभेत तसंच राज्यसभेत्त देखील, विरोधी पक्षांनी बिहारमधील मतदार याद्यांच्या पुनरीक्षण विषयावर चर्चेची मागणी करत, घोषणाबाजी सुरु ठेवल्यान वारंवार कामकाज स्थगित होत असल्यानं शेवटी, उभय सभागृहांच कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

राष्ट्रीय प्रसारण दिन

आज राष्ट्रीय प्रसारण दिन आहे.  २३ जुलै १९२७ या दिवशी, देशातलं पहिलं नभोवाणी प्रसारण मुंबई केंद्रावरून इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनीच्या अंतर्गत सुरू झालं. ८ जून १९३६ रोजी, भारतीय सार्वजनिक प्रसारण सेवा ऑल इंडिया रेडिओ  मध्ये रुपांतरित झाली. ऑगस्ट १९३७ मध्ये केंद्रीय वृत्तसंस्था  अस्तित्वात आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५६ मध्ये आकाशवाणी हे नाव ऑल इंडिया रेडियोसाठी स्वीकारण्यात आलं. १९५७ मध्ये विविध भारती ही जाहिरात प्रसारण सेवा सुरू झाली. १५ एप्रिल १९५४ पासून आकाशवाणी मुंबईचा प्रादेशिक वृत्त विभाग श्रोत्यांच्या सेवेत आहे. विश्वासार्ह आणि ताज्या बातम्या हे आकाशवाणीच्या बातमीपत्रांचं वैशिष्ट्य आहे. रेडिओ हा देशवासियांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग असून, बहुजन हिताय, बहुजन सुखाय या आपल्या ब्रीदवाक्यानुसार आकाशवाणी ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाची भूक भागवण्याचं करण्याचं कार्य करत आहे. देशवासियांसाठी महत्त्वाच्या घोषणा, तसंच उच्चपदस्थांचे संदेश आकाशवाणीवरुन प्रसारित केले जातात. पंतप्रधान नरेंद्र मोदी पदावर आल्यापासून मन की बात या कार्यक्रमाद्वारे दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी आकाशवाणीवरुन देशवासियांशी संवाद साधतात. या दिवसानिमित्त आकाशवाणीच्या महासंचालक प्रज्ञा पालिवाल गौर यांनी संदेश  दिला आहे.

***What began as a modest experiment in sound has over the decades involved into a powerful public institution. Akashvani, the voice of the nation. And Akashvani is now available on Waves OTT, a major leap towards anytime, anywhere listening. At the heart of all these initiatives lies one unwavering belief. Public broadcasting must not only reflect society but also anticipate its needs. Akashvani News has for decades stood as a pillar of truth in the ever evolving media landscape.***

आकाशवाणीच्या वर्धापन दिनानिमित्त ठिकठिकाणच्या आकाशवाणी केंद्रांवर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

संजीवन समाधी सोहळा

श्रीसंत नामदेव महाराज यांच्या 675 व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संत नामदेव पायरीचे पंढरपूर येथे दर्शन घेतले. श्री संत नामदेव महाराजांच्या पायरीचे विधिवत पूजन करून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. तसेच श्री संत चोखामेळा समाधीचे व श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शनही मुख्यमंत्र्यांनी घेतले. याप्रसंगी संत नामदेव महाराज भक्तांच्या मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केले. वैश्विक एकात्मता टिकवण्याचे काम संत नामदेव महाराज यांनी केले . पंढरपुरात नामदेव महाराजांचे भव्य स्मारक उभे केले जाणार आहे. नामदेव महाराजांचे खरे स्मारक त्यांच्या विचारात असून. नामदेव महाराजांचे विचार आणि साहित्य राज्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आपण करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. सामाजिक समरसता आणि एकात्मता टिकवण्याचे काम संत नामदेवांनी मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावण्यापूर्वीच भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार करून केले असल्याचे प्रतिपादन यावेळी फडणवीस यांनी केले.

***आपला विचार वैश्विक करणारे हे नामदेव महाराज होते आणिभारत आपल्या पूर्व, पश्चिम उत्तर दक्षिण सगळ्या भागाला जोडणारे आपले नामदेव महाराज या ठिकाणी होते खरं म्हणजे त्यांच्या वडिलांची इच्छा होती. की त्यांनी जो पारंपारिक आपला व्यवसाय शिंपी तो व्यवसाय करावा. पण तो व्यवसाय त्यांनी स्वीकारला नाही, कारण त्यांना सामाजिक समरस्तेचं वस्त्र हे विण्याचं होतं आणि ते वस्त्र विणुन त्यांनी संपूर्ण समाजाला एकता काय असते हे शिकवण्याचं काम केलं आणि म्हणूनच मला असं वाटतं कि, ही जी समाजाची शिवण शिवण्याची त्यांची शिवणकला होती ही अतिशय अद्भुत अशा प्रकारची शिवणकला होती, ज्यांनी या समाजाला दिशा देण्याचं काम केलं.***

मुख्यमंत्री यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करून माहिती घेतली. विठ्ठलाची महापूजा आणि विविध रूपे सर्वसामान्य भाविकांना पाहता यावीत यासाठी विठ्ठल मंदिरात वीआर दर्शन सुविधेचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. गॉगलद्वारे देवाची विविध रूपे आता देशभरातील भाविकांना पाहायला मिळणार आहे. यापूर्वी उज्जैन आणि काशी विश्वेश्वर या देशातल्या दोन ठिकाणी अशा पद्धतीची सुविधा उपलब्ध आहे.

टिळक/आझाद जयंती

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची आज जयंती आहे. यानिमित्त विविध ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात येत असून विविध उपक्रमांच आयोजन करण्यात आल आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. लोकमान्य टिळकानी देशवासियांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत चेतवली. ज्ञानाच्या बळावर आणि लोकसेवेवर दृढ विश्वास असलेले ते नेते होते, असं मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. राज्यात सर्व जिल्हयाच्या मुख्यालयी टिळकांना अभिवादन करण्यात आले. थोर क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतिनिमित्तही पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून त्यांना आदरांजली वाहिली आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी-पुरस्कार

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (हिंद स्वराज्य संघ) वतीने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. १ ऑगस्ट शुक्रवार रोजी लोकमान्य टिळक यांची १०५ वी पुण्यतिथी आहे. त्या दिवशी सकाळी १०.३० वाजता टिळक स्मारक मंदिरात होणाऱ्या सोहळ्यात लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराचे वितरण होईल. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.रोहित टिळक यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.  रस्ते हे विकासाचे साधन आहे, हे ओळखून गडकरी यांनी देशभर महामार्गांचे जाळे उभारले. सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या प्रारूपातून त्यांनी देशातील पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. नमामी गंगा प्रकल्पाला त्यांच्याच प्रयत्नाने लोकचळवळीचे स्वरूप आले, असे डॉ. रोहित टिळक यांनी नमूद केले. पुरस्कार वितरण सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे उपस्थित राहणार आहेत. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र आणि एक लाख रुपये, असे लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराचे स्वरूप आहे.

सरन्यायाधिश दौरा

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई हे गुरूवार, 24 जुलैपासून तीन दिवस अमरावती जिल्हयाच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात दारापूर, दर्यापूर आणि अमरावती येथील विविध कार्यक्रमाला  गवई उपस्थित राहतील.

हवामान

आजपासून 26 जुलै पर्यंत संपूर्ण विदर्भात हलक्या ते मध्यम पावसाचा येलो अलर्ट घोषित करण्यात आला असून, 25 ते 26 जुलै दरम्यान नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या ठिकाणी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट घोषित करण्यात आला आहे. आज नागपूर शहरात दुपारी पावसाची रिपरीप चालू होती. बुलढाणा जिल्हयातील खामगाव, शेगाव आणि लोणार तालुक्यातील ८ मंडळ क्षेत्रामध्ये ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यामुळे या क्षेत्रामध्ये घरांचे आणि शेतजमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीने दिली आहे. यवतमाळमध्ये मुसळधार पावसाला सुरूवात झाली असून, अनेक ठिकाणी पावसाचा जोर कायम आहे. शहरासह ग्रामीण भागातही जोरदार पावसामुळे जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे.

******